## हॅप्पी बर्थ डे


शर्मिला राज ठाकरे (मनसे)


डिंपल कपाडिया (अभिनेत्री)


शिल्पा शेट्टी (अभिनेत्री)


जय महेश कांबळे (९ वा वाढदिवस)

समेर कोडिलकर (पत्रकार)

विनोद शहा (निर्माता)

अजय सोनवणे (पत्रकार)

मधू मल्होत्रा (अभिनेत्री)

गिरी बाबू (अभिनेता)

शुभदा राजीव साबडे (क्रीडा)

## वेचक

### नगर-पुणे महामार्गावर अपघात; केडगावच्या तरुणाचा जागीच मृत्यू

**अहिल्यानगर :** नगर नगरहून सुपा एमआयडीसीत कामानिमित्त चाललेल्या तरुणाच्या मोटारसायकलला पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या आयशर टेम्पोने धडक दिल्याने रस्त्यावर पडून त्या तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना नगर पूणे महामार्गावर सुप्याजवळील पवारवाडी घाटात असलेल्या.
ग्रीन हेवन मंगलकार्यालयासमोर ५ जून रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली. सोफियान अय्युब शेख (वय २४,रा.शाहूनगर, केडगाव) असे मयत तरुणाचे नाव आहे.मयत सोफियान शेख हा सुपा एमआयडीसीत काम करत होता.त्यानिमित्तानेच तो ५ जून रोजी नेहमीप्रमाणे आपल्या हिरो कंपनीच्या स्प्लेंडर प्रो मोटारसायकलवर (क्र. एमएच १६ ए क्यु ७७०२) केडगावहून सुप्याकडे चालला होता.घाटात असलेल्या ग्रीन हेवन मंगल कार्यालयासमोर त्याच्या पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या आयशर टेम्पोने त्याला धडक दिल्याने तो पडला.त्याच्या डोक्याला गंभीर इजा होवून त्याचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांनी तो टेम्पो अडवून चालकाला टेम्पोसह ताब्यात घेत पोति ठाण्यात आणले. या प्रकरणी सुपा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून मयताच्या नातेवाईकांच्या फिर्यादीनंतर अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.सोफियान शेख याच्या पश्चात पत्नी व १ मुलगी आहे.

### राष्ट्रीय समाज पक्षाचे शहाजी कोरडकर हद्दपार

**श्रीगोंदा :** विविध गुन्हे दाखल असलेल्या श्रीगोंदा तालुक्यातील भावडी येथील राष्ट्रीय समाज पक्षाचा कार्यकर्ता शहाजी रामचंद्र कोरडकर याला उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांनी जिल्ह्यातून सहा महिन्याच्या कालावधी करिता हद्दपार केले असल्याचा आदेश श्रीकुमार चिंचकर यांनी काढला.
राष्ट्रीय समाज पक्षाचा कार्यकर्ता असलेल्या भावडी येथील शहाजी रामचंद्र कोरडकर या कार्यकर्त्यावर श्रीगोंदा पोलीस ठाण्यात चोरी,अॅट्रॉसिटी,बनावट खरेदी खत,दमदाटी करणे,मारहाण करणे यासारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत.गुन्हेगारी प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी त्याच्यावर यापूर्वी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात प्रतिबंधात्मक कारवाई करून सुद्धा त्याच्या चारित्र्य आणि सवयीत कसलीही सुधारणा न होता उलट तो मगरूर व धाडसी प्रवृत्तीचा झाल्याने परिसरातील लोकांच्या मनात दहशत निर्माण होऊन त्याच्या कृतीमुळे परिसरातील सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था धोक्यात आली आल्याने महाराष्ट्र पोलीस अधिनियमाद्वारे त्यास हद्दपार करण्यात बाबत श्रीगोंदा पोलिसांनी उपविभागीय दंडाधिकारी श्रीगोंदा कर्जत यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार उपविभागीय दंडाधिकारी यांनी शहाजी रामचंद्र कोरटकर यास संपूर्ण नगर जिल्हात सहा महिन्याकरिता हद्दपार केल्याचे आदेश काढले.

### मोदी सरकार ११ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल 'एक पेड माँ के नाम'



**कर्जत :** कर्जत सर्व सामाजिक संघटना व प्रबोधनकार क्रीडा व सांस्कृतिक ग्रामीण सेवाभावी प्रतिष्ठान कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकार ११ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल "एक पेड माँ के नाम" वृक्षारोपण संपन्न झाले.यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस सचिन पोटरे यांच्या संकल्पनेतून कर्जत शहरात वृक्ष लागवड करण्यात आली.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारला ११ वर्षे पूर्ण झाली असून मोदी सरकारचा ११ वर्षातील यशस्वी प्रवास व विकासाभिमुख कार्य अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचवावा 'संकल्प ते सिद्धीपर्यंत' या सूत्रानुसार "एक पेड माँ के नाम 'या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतुन वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मागील १ हजार ७०८ दिवसांपासून जवळपास दीड लाख वृक्षारोपण करून त्याचे यशस्वी जतन करणारे स्वच्छ,सुंदर आणि हरित कर्जतसाठी झटणारे सर्व सामाजिक संघटना आणि प्रबोधनकार क्रीडा व सांस्कृतिक ग्रामीण सेवाभावी प्रतिष्ठानच्या वतीने शनिवार,दि ७ रोजी सकाळी साडेसहा ते साडेसात या वेळेत बुवासाहेब नगर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी नगराध्यक्षा रोहिणी घुले, उपनगराध्यक्ष संतोष मेहेत्रे, मंडळ अध्यक्ष अनिल गदादे, विनोद दळवी, सुनील यादव, सुनील शेलार, रवींद्र सुपेकर, प्रशांत शिंदे यांच्यासह सर्व सामाजिक संघटनेचे श्रमप्रेमी उपस्थित होते.

# शेअर मार्केटच्या नावाखाली १ कोटी २३ लाखांचा गंडा

◆ शेवगाव (प्रतिनिधी):



शेअर मार्केटच्या नावा रवाली अधिक परताव्याचे अभिष दाखवून तब्बल एक कोटी २३ लाख ६७ हजार ६०० रुपयाला गंडा घालून तीन महिन्यापासून फरार झालेल्या जालिंदर संतोष दहीवाळ रा.शास्त्रीनगर शेवगाव या आरोपीला शेवगाव पोलिसानी सापळा लावून पुणे जिल्ह्यातील चाकण जवळ जेरबंद केले आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की ज्ञानेश्वर आसाराम देवढे वय ४२ धंदा-शेती रा.दादेगाव,शेवगाव यांनी दिनांक १८ मार्च २०२५ रोजी शेवगांव पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीवरुन फसवणुकी सह एमपीआयडी नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.सदर गुन्हयातील आरोपी जालींदर संतोष दहीवाळ रा शास्त्रीनगर शेवगांव,मुळ रा.पाचोड जिल्हा – संभाजीनगर याने फिर्यादीस मी शेअर मार्केट मध्ये ट्रेडींग करतो,माझे कडे पैसे गुंतविल्यास मी तुंम्हाला मासीक १० टक्के परतावा देईल असे आमिष दाखवुन फिर्यादी कडुन रोख व ऑनलाईन स्वरुपात पाच लाख रुपये घेतले होते,फिर्यादीस ठरलेल्या व्यवहारा प्रमाणे परतावा अगर मुळ रक्कम न देता आरोपी हा पळुन गेला होता,सदर गुन्हयाचे तपासात गुन्हयातील आरोपी जालींदर संतोष दहीवाळ याने फिर्यादी प्रमाणेच ईतर १९ लोकांकडुन देखील शेअर मार्केट ट्रेडींग व्दारे जास्त परतावा देण्याचे आमिष दाखवुन त्यांचेकडुन देखील रोख व ऑनलाईन स्वरुपात ठेवी स्वीकारुन त्यांना ठरलेल्या व्यवहाराप्रमाणे मुळ रक्कम व परतावा न देता त्यांची देखील फसवणुक केली असलेबाबत तपासात निष्पन्न झाले होते,फिर्यादी व १९ साक्षीदार यांची एकुण रक्कम रुपये एक कोटी २३ लाख ६७ हजार ६०० रुपये -फसवणुक केल्याचे निष्पन्न झाले.गुन्हयातील आरोपी जालींदर दहीवाळ हा गुन्हा दाखल झाले पासुन फरार होता.मा.जिल्हा व सत्र न्यायालय अ.नगर यांनी आरोपीताचा अटकपुर्व जामीन अर्ज देखील फेटाळला.त्यामुळे आरोपी हा अटक चुकविण्यासाठी ठिकाणे बदलुन राहत होता.सदर गुन्हयाचे तपास करीत असतांना गुन्हयाचे तपास अधिकारी सपोनि धरमसिंग सुंदरडे यांना दिनांक ३ जून .२०२५ रोजी आरोपी जालींदर दहीवाळ हा चाकण (जिल्हा- पुणे ) येथे असल्याची बातमी मिळाल्याने त्यांनी सदरची बातमी पोनि समाधान नागरे यांना दिली.वरिल आरोपी विरुध्द इतर कोणीही व्यथीत अगर बळीत अशा जनतेची फसवणुक झाली असल्यास त्यांनी बिनधास्तपणे संपर्क साधावा असे आवाहन पोनि नागरे यांनी केले आहे.सदरची कारवाई पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे,प्रशांत खैर,सुनिल पाटील उपविभाग शेवगांव यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. समाधान नागरे,तपास अधिकारी सपोनि धरमसिंग सुंदरडे,पोकॉ/राहुल आठरे,पोकॉ/श्याम गुंजाळ,होमगार्ड/विजय तुपविहीरे,नगर दक्षिण जिल्हा मोबाईल सेल चे पोकॉ/नितीन शिंदे व पोकॉ/राहुल गुडडु यांनी केली असुन गुन्ह्यांचा तपास सपोनि सुंदरडे करत आहेत.

## शिर्डीत राष्ट्रवादीचे मोफत करिअर मार्गदर्शन शिबीर

◆ शिर्डी (प्रतिनिधी):

शिर्डी शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित इयत्ता आठवी ते बारावी पर्यंतचे विद्यार्थी त्यांचे पालक व शिक्षकांसाठी मोफत करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन आज दि ८ रविवार रोजी शिर्डी येथे सकाळी दहा ते एक या वेळेत हॉटेल विदिशा पॅलेस कणकुरी रोड येथे केले आहे.या करिअर गाईडन्स शिबिराचा विद्यार्थी पालक व शिक्षकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने शिर्डी शहराध्यक्ष दीपक रमेशभाऊ गोंदकर यांनी केले. करिअर गार्डन शिबिरासाठी घे भरारी तू आकाशी स्वप्नांकडे ही टॅगलईन वापरून या विशेष करियर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन राष्ट्रवादी कॉंग्रेस कमिटी शिर्डीच्या वतीने केले आहे विद्यार्थी व पालक तसेच शिक्षकांच्या दृष्टीने हे शिबिर आयोजित केले आहे इयत्ता आठवी ते बारावी मधील विद्यार्थी व त्यांचे पालक आणि शिक्षकांसह या विषयाची आवड असणाऱ्यां सर्वांसाठी मार्गदर्शन शिबिर खुले ठेवले आहे या सत्रात शैक्षणिक आणि करिअर संधी बाबत सखोल मार्गदर्शन करणार आहे या सत्रातून काय मिळेल विज्ञान, वाणिज्य, कला, आणि व्यावसायिक, अभ्यासक्रमाचे पर्याय Jee, neet, Curt,mht,cet,nda,Clat, Ipmat, Nid, Nift, Nata,Nchmct परीक्षांची माहिती Set, Ielts, Toefl, Gre,Gmet, यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय परीक्षा बाबतची पूर्व तयारी या परीक्षांना सामोरे जाताना द्यावी लागणारी अभ्यासाची दिशा तसेच योग्य करिअर निवडण्यासाठीचे तंत्र आवड क्षमता आणि संधी यांचे महत्त्व या शिबिरात तज्ञांकडून समजावून सांगितले जाणार आहे पालकांची भूमिका आणि योग्य मार्गदर्शन याची गरज याविषयी अजिंक्य संजय खंडीझोड यांचे मार्गदर्शन लाभणार आहे या शिबिराचे आयोजन निलेश शिंदे राष्ट्रवादी युवक अध्यक्ष दीपक रमेश गोंदकर यांच्या संकल्पनेतून केले आहे या करिअर गाईडन्स शिबिरास शिर्डी सह परिसरातील विद्यार्थी विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

## दंडकारण्य अभियानांतर्गत वटसावित्री पोर्णिमेनिमित्त २५२५ वटवृक्षांचे रोपन

◆ संगमनेर (प्रतिनिधी):







थोर स्वातंत्र्य सेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून हरितसृष्टीसह पर्यावरण संवर्धनाचा मुलमंत्र देणाऱ्या दंडकारण्य अभियानाअंतर्गत वटवृक्ष लागवड सप्ताहात मंगळवार दि.१० जून २०२५ रोजी वटसावित्री पौर्णिमेनिमित्त तालुक्यातील प्रत्येक गावात व वाडीवस्तीवर २५२५ वटवृक्षांचे रोपन करण्यात येणार असल्याची माहिती प्रकल्पप्रमुख सौ.दुर्गाताई तांबे व डॉ.जयश्रीताई थोरात यांनी दिली.

यावेळी अधिक माहिती देताना सौ.दुर्गाताई तांबे म्हणाल्या की,सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून सुरू झालेले हे अभियान मा.महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, दंडकारण्य अभियानाचे मुख्यप्रवर्तक मा.आ.डॉ.सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकचळवळ झाले आहे.वृक्षसंस्कृती जोपासणाऱ्या या चळवळीने देशपातळीवर मोठा लौकिक निर्माण केला आहे.प्रत्येक नागरिकाचा सहभागामुळे या चळवळीला यश आले आहे. यामुळे वृक्षतोड टळली असून उजाड बोडखी डोंगरे झाडांनी हिरवीगार दिसू लागली आहे.भारतीय संस्कृतीत अत्यंत महत्वाचा असणारा वटपोर्णिमा हा महिलांचा सण आहे.वडाचे झाड अत्यंत औषधी व आरोग्यासाठी फलदायी आहे.आयुर्वेदामध्येही वटवृक्ष,रुई,उंबर,पिंपळ या झाडांना देव वृक्ष म्हणून संबोधले आहे.त्याचे प्रमुख कारण म्हणजे ही वृक्ष जास्त प्रमाणात ऑक्सीजन निर्माण करतात. हिरवीगार सावली,परिसराचे वैभव,आयुर्वेद,पूजापाठ व सजीवांसाठी शुद्ध ऑक्सीजन मिळणार आहे.तर डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाल्या, की पर्यावरणाचा ऱ्हास होत चालल्याने ग्लोबल वॉर्मिंगची समस्या उभी राहून उन्हाळ्यात लहान, मोठ्या सजिवांना जगणे असहाय झाले आहे.म्हणून प्रत्येक महिलेने किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन केले पाहिजे. घराच्या भोवती परसबाग लावून फळझाडे, फूलझाडे वाढवावी. पुढील पिढीला चित्रातून झाडे दाखविण्याऐवजी प्रत्यक्ष त्या झाडाच्याच सावलीत खेळण्याचा आनंद मिळावा म्हणून दंडकारण्य अभियानात प्रत्येकाने सहभाग नोंदवावा असे आवाहन ही त्यांनी केले आहे.

महिला वर्गातून या अभिनव उपक्रमाचे मोठे स्वागत करण्यात आले असून संगमनेर तालुक्याचा हा उपक्रम संपूर्ण देशाला मार्गदर्शक ठरणार आहे.

## अमृतवाहिनीमध्ये शिवराज्याभिषेक दिनानिमित्त पालकांचा सत्कार

◆ संगमनेर (प्रतिनिधी):



तालुक्यातील अमृतवाहिनी आय.टी.आय. मध्ये शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा झाला. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी सदर कार्यक्रमाचे ऑनलाइन उद्घाटन केले.या कार्यक्रमानिमित अमृतवाहिनी आय.टी.आय. मध्ये तंत्र प्रदर्शन भरवण्यात आले.सदर तंत्र प्रदर्शनाचे उद्घाटन अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे यांनी रिमोट द्वारे केले.या उद्घाटनासाठी संस्थेचे मॅनेजर व्ही.बी.धुमाळ,संस्थेचे अकॅडेमीक डायरेक्टर डॉ.जे. बी.गुरव,अमृतवाहिनी आय.टी. आय.चे प्राचार्य व्ही.व्ही. भाटे,अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजमधील सिव्हील विभागातील प्रा.चेतन कडलग,अमृतवाहिनी आय.टी.आयचे सर्व स्टाफ,विद्यार्थी व पालक हजर होते.या कार्यक्रमानिमित आयटीआय मध्ये पालकांचा सत्कार करण्यात आला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च गुणवत्तेचे शिक्षण मिळावे,यासाठी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी अमृतवाहिनी आय.टी.आय.ची स्थापना १९८४ साली केली. संस्थेने गुणवत्तेत सातत्य राखल्याने संस्थेचा नावलौकिक वाढला आहे. येथील शैक्षणिक वातावरण,निसर्ग सुंदर परिसर,शिस्त,स्वच्छता तसेच विद्यार्थ्यांना प्लेसमेंट व आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत.यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा.चेतन कडलग यांनी पर्यावरण व संरक्षण विषयावर आपले व्याख्यान दिले. व्याख्यानात बोलताना छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ रोजी झाला होता. आज त्या राज्याभिषेक सोहळ्यास ३५० वर्षे पूर्ण झालेली आहेत. या कार्यक्रमाचे औचित्य साधून कौशल्य विकास विभागाने संपूर्ण महाराष्ट्रातील शासकीय व अशासकीय आय.टी.आय.मध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्र फडणवीस व कौशल्य विकास मंत्री मा.ना.मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम यशस्वी करण्यात आला आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन मोरे यांनी केले तर आभार प्राचार्य व्ही.व्ही.भाटे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व स्टाफ व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले आहे.तसेच अमृतवाहिनी आय.टी.आय.साकुर व आय.टी. आय.तळेगाव दिघे येथेही स्वतंत्र पणे शिवराज्याभिषेक दिन उत्साह साजरा करण्यात आला. सर्व यशस्वी विद्यार्थी व पालकांचे संस्थेचे अध्यक्ष माजी शिक्षणमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, विश्वस्त डॉ.सुधीर तांबे विश्वस्त सौ.शरयू देशमुख ,मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, मॅनेजर व्ही.बी.धुमाळ, डायरेक्टर अकॅडेमिक डॉ.जे.बी.गुरव, आय.टी. आयचे प्राचार्य व्ही.व्ही.भाटे यांनी अभिनंदन केले.

## चोवीस तासांच्या आत शैक्षणिक दाखल्यांचे वितरण करा : तहसीलदार




◆ कोपरगाव (प्रतिनिधी):

येथील तहसील कार्यालयात अर्ज प्राप्त झाल्यापासून चोवीस तासाच्या आत विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी लागणाऱ्या दाखल्यांचे वितरण करण्याच्या सूचना तहसीलदार महेश सावंत यांनी तालुक्यातील सेतू चालकांना दिल्या. कोपरगाव तालुक्यातील सर्व सेतु, महा ई-सेवा केंद्रचालकाची बैठकीत ते बोलत होते. कोपरगांव तालुकयातील अर्जदारांना दाखल्यासंदर्भात कुठलाही त्रास होता कामा नये, सर्व सेतूकेंद्र चालकांनी प्रमाणपत्रांसाठीची फी दर्शविणार फलक दर्शनी भागात लावावेत, लवकरच तालुक्यातील सर्व सेतूच्या कामकाजाची तपासणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. सेतूकेंद्रात अर्ज दाखल झाल्यावर त्याच दिवशी तो ऑनलाईन पोर्टलला अपलोड झालाच पाहिजे. बैठकीत तालुक्यातील सर्व सेतू केंद्र चालक उपस्थित होते.

## आपल्या धर्मासह श्रद्धा दृढ असावी : भास्करगिरी महाराज

◆ नेवासा (प्रतिनिधी) :



नेवासा तालुक्यातील पिचडगाव येथील माऊली आश्रमात विठ्ठल रुख्मिणी व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा निमित्त सुरू असलेल्या त्रिदिनात्मक सोहळ्याला देवगड येथील श्री दत्त मंदिर संस्थानचे महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज,सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत श्री रमेशानंदगिरीजी महाराज यांनी भेट दिली.यावेळी उपस्थित संत महंतांच्या हस्ते येथे सुरू असलेल्या धार्मिक पूजेतील यज्ञ कुंडाचे पूजन करण्यात येऊन आहुती टाकण्यात आली.आपल्या धर्मासह श्री गुरूबद्दल व देवाबद्दल असलेली श्रध्दा दृढ ठेवा असे आवाहन गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांनी यावेळी बोलतांना केली. यावेळी झालेल्या संत महंतांच्या भेटी प्रसंगी टाळ मृदुंगाच्या गजरात माऊली आश्रमातील भाविकांच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आली.मूर्ती प्राणप्रतिष्ठा निमित्ताने १५ यजमानांच्या हस्ते सुरू असलेल्या धार्मिक पूजेप्रसंगी चौरंगावर मांडण्यात आलेल्या कलश व होम यज्ञ कुंडाचे पूजन गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज,गुरुवर्य श्री उध्दवजी महाराज मंडलिक,स्वामी रमेशानंद गिरीजी महाराज,आश्रमाचे प्रमुख हभप ज्ञानेश्वर महाराज हजारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सर्व मंडळींच्या वतीने बोलतांना गुरुवर्य भास्करगिरीजी म्हणाले की मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळयाच्या निमित्ताने माऊली आश्रमात होणारी पूजा ही नास्तिक माणसाला देखील हात जोडायला लावील अशी आहे,मूर्तीच्या रूपाने भगवंत हे सगुण साकार होत असतात,संत आणि देव यांच्यात भिन्नता नसून त्यांचे स्वरूप एकच असल्याचे सांगत त्यांनी धर्माबद्दल आपल्या श्री गुरूबद्दल देवाबद्दल असलेली श्रद्धा दृढ अशी ठेवा असे आवाहन करून त्यांनी मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळयाच्या निमित्ताने शुभाशीर्वादरुपी शुभेच्छा दिल्या.यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.पत्रकार सुधीर चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले तर ज्ञानेश्वर महाराज हजारे यांनी उपस्थित संत महंतांसह भाविकांचे आभार मानले.

## माजी मंत्री बाळासाहेब थोरातांच्या दूरदृष्टीतून जलसमृद्धी

◆ संगमनेर (प्रतिनिधी) :



दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा याकरता माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सतत पाठपुरावा करून धरण व कार्य पूर्ण केले आणि आता निळवंडे धरणाचे पाणी डावा आणि उजवा कालव्यांमार्फत शेतकऱ्यांच्या शेतात पोहोचले आणि संपूर्ण तालुक्यात जल्लोषाचे,आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले.या यशामागे उभा आहे एक दूरदृष्टी संपन्न नेतृत्व असल्याने तालुका पाणीदार होत आहे.

निळवंडे च्या पाण्याचे गावागावांमध्ये जलपूजन, ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुका, फटाक्यांची आतषबाजी आणि युवकांचा आनंदोत्सव – हा उत्सव म्हणजे केवळ जलपूजन नव्हते,तर एका स्वप्नपूर्तीचा साक्षात साक्षात्कार होता.शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी निर्माण होणार आहे.बाळासाहेब थोरात यांनी मंत्री असताना विकासाचा आणि विशेषतः पाणी प्रकल्पांचा जो ध्यास घेतला,त्यातूनच निळवंडे धरण तसेच त्याला जोडलेले डावा आणि उजवा कालवे पूर्णत्वास गेले. या कार्यासाठी त्यांनी आमदारकी आणि मंत्रीपदाचीही तमा न बाळगता अविरत संघर्ष केला.त्यांच्या नेतृत्वामुळे आज दुष्काळी भागात पाणी पोहोचले असून,शेतकऱ्यांच्या आयुष्यात खराखुरा आनंद आला आहे.गावोगावी उत्सवाचं वातावरण अंभोरे,पानोडी,मालुंजे,पिंपरणे,चिंचोली गुरव,वरझडी,कासारे,लोहारे देवकवठे ,मीरपुर,हिवरगाव पावसा,निमगाव टेंभी,देवगाव, वाघापूर,खराडी आदी गावांमध्ये जलपूजनाचे कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले.या पाइपद्वारे कालव्याचे पाणी विविध बंधाऱ्यांमध्ये पोहोचवले गेले. परिणामी गावागावात जलपूजनाचा सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला. हिवरगाव पावसा व घुलेवाडी येथे बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते पार पडलेल्या जलपूजन सोहळ्याला हजारोंच्या संख्येने ग्रामस्थांनी हजेरी लावली. ढोल-ताशांमध्ये निळवंडेच्या पाण्याचे स्वागत करण्यात आले.यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की निळवंडे चे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात आल्याने स्वप्नपूर्ती झाली आहे. मात्र कालव्यांच्या वरच्या बाजूला जे शेतकरी आहेत त्यांच्या करता ही पाणी देण्यासाठी आराखडा केला आहे.सत्ता असून असो या पुढील काळात या शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी आपला पाठपुरावा सुरूच राहणार आहे.

## बंदी असलेले मांगूर जातीचे साडेचार टन मासे जप्त

◆ राहाता (प्रतिनिधी):



मानवी शरीरास व पर्यावरणास अपायकारक असलेला व देशात प्रतिबंधीत असलेले मांगुर जातीचे साडेचार टन वजनाचे तर साडेचार लाख रुपये किमतीचे मांगुर मासे ताब्यात घेऊन राहाता पोलिसांनी नगरपालिका कर्मचाऱ्यांच्या मदतीने या माशांची खड्डे घेऊन विल्हेवाट लावली आहे भिगवन येथून मालवाहू ट्रक मध्ये घेऊन हे मांगुर प्रजातीचे मासे मध्य प्रदेशात घेऊन चालले होते पोलिसांनी केलेल्या नाकाबंदीत हा मालट्रक पोलिसांनी ताब्यात घेतला होता याप्रकरणी बस चालकासह इतर आरोपी विरोधात राहाता पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला

पोलीस अधिक्षक सोमनाथ गार्गे श्रीरामपूरचे अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबर्मं शिर्डी उपविभागाचे पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शना खाली बकरी ईद च्या पार्श्वभूमीवर अवैध गोवंश वाहतुक कारवाईचे अनुषंगाने राहाता पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन चव्हाण पोलीस उपनिरीक्षक योगेश शिंदे,किरण सांळुखे, प्रभाकर शिरसाठ,विशाल पंडोरे,अनिल गवांदे,पोलीस नाईक विनोद गंभीरे व चापोहेकॉ शेषराव अनारसे हे दि ६ जून रोजी चितळी चौकात नाकाबंदी करीत असतांना एक पांढरे रंगाचा अशोक लेलॅड कंपनीचा ट्रक क्रमांक आरजे २५ जीए ६९५८ असा अहिल्यानगर कडुन शिर्डी दिशेने संशयीतरित्या दिसून आल्याने त्यास चितळी चौक येथे थांबवुन खात्री केली असता त्यात देशात प्रतिबंधीत असलेले मांगुर जातीतील प्रकरातील मासेंनी भरलेला ट्रक मिळ्दुन आल्याने ट्रक चालक यांस त्याबाबत विचारता तो उडवाउडवीचे उत्तरे देव् लागल्याने सदर मासेंबावत खात्री करणेकरीता अहिल्यानगर येथील प्रभारी सहाय्यक मत्सव्यवसाय विकास अधिकारी सौ. प्रतिक्षा सुधाकर पाटेकर यांना बोलावुन घेवुन त्यांचे मार्फतीने खात्री केली असता सदर ट्रक मध्ये सुमारे ४ चार लाख ६० हजार रुपये किंचे सुमारे ४ हजार ६०० किलो वजनाचे शासनाने प्रतिबंध केलेले मांगुर जातीचे अर्थात साडेचार वजनाचे मांगुर मासे मिळून आले प्रकरातील मासे मिळुन आल्याने पंचनामा करुन सदरचा पर्यावरणाला धोका निर्माण करुन तसेच लोकांनी खाल्यास मोठ्या स्वरुपात गंभीर आजार व दुखापत होण्याची जाणीव असतांना यातील आरोपी सादाब हकिम खान वय २५ वर्ष रा.पुनसवास वार्ड क्रमांक १४ नेताजी धरमपुरी ता.धरमपुरी जि.धार राज्य मध्यप्रदेश मांगीलाल नाथूलाल कहार वय ३५ वर्ष रा.राजगड ता.सरदारपुर जिल्हा धार राज्य मध्यप्रदेश नरसिंहा मुंग्रा रा. भिगवण जिल्हा पुणे व कमल चौहान रा राजगड जिल्हा धार राज्य मध्यप्रदेश यांच्याविरुध्द गुन्हा रजि. क्रमांक २४६/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २२३२७५ सह अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ चे कलम ५८ व ५९ व पर्यावरण (संरक्षण) अधिनीयम १९८६ चे कलम ३,५,१५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.